नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २५० | Issue - 250 | वार शुक्रवार दि. ३० जानेवारी २०२६ | Blow- Friday Date 30 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# उपमुख्यमंत्री अजित पवार अनंतात विलीन

## अजित दादांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप, अजित दादांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार अनंतात विलीन झाले आहेत. दादांना अखेरचा निरोप देण्यासाठी महाराष्ट्र लोटला होता. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अजित दादांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या दादाला निरोप देताना उपस्थित कार्यकर्त्यांनी अजित दादा अमर रहे च्या घोषणा दिल्या. देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील सर्व वरिष्ठ नेते आणि अधिकारी उपस्थित होते.



अंत्यसंस्कारावेळी कार्यकर्त्यांच्या अश्रुंचा बांध फुटला त्यांनी 'परत परत या अजित दादा परत या' अशी घोषणाबाजी केली.

अजित दादा यांचे पार्थिव सकाळी काटेवाडी येथील निव-ासस्थानी आणण्यात आले होते. बारामतीकरांनी काळजावर दगज ठेवत शेवटचं दर्शन घेतलं, त्यानंतर फुलांनी सजवलेल्या ट्रकमधून दादांची अंत्ययात्रा विद्या प्रतिष्ठानच्या मैदानाकडे नेण्यात आलेली, तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूल मोठ्या प्रम ाणात गर्दी पाहायला मिळाली. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर लाखोंच्या संख्येने जनगसागर लोटल्याचं पाहायला मिळाला. पार्थ आणि जय पवार या दोघा पुत्रांनी दादांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला.

अजित पवार यांच्या अच-ानक निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या धक्क्याने सर्वच जण हादरले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा,



काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह देशभरातील अनेक दिग्गजांनी अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

# सुनेत्रा पवार बारामतीची पोटनिवडणूक लढवून उपमुख्यमंत्री होणार?

## अजितदादांच्या राजकीय वारसावरुन पडद्यामागे जोरदार हालचाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे अनंतात विलीन झाले आहेत. परंतु त्यांच्या निधनानंतर आता त्यांचा राजकीय वारसदार कोण असा प्रश्न विचारला जात आहे. त्यासंबंधी पडद्यामागे राजकीय हालचालीही सुरू झाल्या आ-हेत. त्यातच आता सुनेत्रा पवारांनाच (डींपर्शीर झुरी) उपमुख्यमंत्री करा अशी एक मागणी जोर धरताना दिसत आहे. राज्यसभेवर असलेल्या सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या हंगामी अध्यक्ष करावे आणि त्यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूकही लढवावी अशी मागणी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

अजित पवारांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी पोकळी निर्माण झाल्याचं चित्र आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची जोरदार चर्चा सुरू असताना, तशी पावलंही पडत असताना अजित पवारांचे निधन झाले. त्यामुळे आता त्यांचा राजकीय वारसदार कोण याची चर्चा सुरू झाल्याचं दिसतंय.

राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सु-नेत्रा पवारांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. तर नर-हरी झिरवाळांनी सुनेत्रा पवार यांनाच उपमुख्यमंत्री करा अशी मागणी केली. त्यामुळे सुनेत्रा पवार यांना राष्ट्रवादीचे हंगामी अध्यक्ष केलं जाण्याची शक्यता असल्याची चर्चा सुरू आहे.

सुनेत्रा पवार या सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत. तर अजित पवारांचे दोन्ही पुत्र, पार्थ आणि जय पवार हे सक्रिय राजकारणात नसले तरी पडद्याम ागून पक्षसंघटनेमध्ये सक्रिय असल्याचं दिसतंय. असं असलं तरी या तिघांनाही राजकारणाचा तितकासा अनुभव नाही.

अजित पवारांच्या निधनानंतर एक उपमुख्यमंत्रिपद सध्या रिक्त आहे. पुढच्या सहा महिन्यात बारामती विधानसभा पोटनिवडणूकही घ्यावी लागणार आहे. त्यामुळे पक्षाचं नेतृत्व करायचं असेल तर सुनेत्रा पवारांनी बारामतीची पोटनिवडणूक लढवावी आणि उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावं अशी एक मागणी जोर धरताना दिसत आहे.

राष्ट्रवादीमध्ये फुट पडल्यानंतर प्रफुल पटेल, सु-नील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे यांच्यासह अनेक बडे नेते अजित पवारांसोबत राहिले. आता दोन्ही राष्ट्रवादींच्या एकीकरणाची चर्चा सुरू असतानाच अजित पवारांचे अचानक निधन झालं.

राष्ट्रवादीच्या एकीकरणासाठी स्वतः अजित पवार हे आग्रही होते असं म्हटलं जात आहे. शरद पवारांच्या वाढदिवसादिवशीच, म्हणजे १२ डिसेंबर रोजीच दोन्ही राष्ट्रवादींचे एकीकरण करून पवारसाहेबांना सरप्राईज देण्याची इच्छा अजित पवारांची होती, पण काही कारणामुळे ते शक्य झालं नसल्याचं वक्तव्य अंकुश काकडे यांनी केलं. त्याम ुळे दोन्ही राष्ट्रवादीचे एकीकरण करून त्याचं नेतृत्व पुन्हा एकदा शरद पवारांच्या हाती देणं हा एक पर्याय असल्याची चर्चाही सुरू आहे.

अजित पवारांसोबत गेलेले नेते हे महायुतीमध्ये मंत्री बनले. सत्तेसाठी हे नेते भाजपसोबत गेले, आणि त्यातील बऱ्याच जणांवर सुरू असलेल्या ईडीच्या कारवायाही थांबल्या. आता दोन्ही राष्ट्रवादी जर एकत्र आल्या आणि पुन्हा शरद पवार प्रमुख बनले तर त्याला अजितदादांसोबतच्या गेलेले नेते तयार होतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शरद पवार हे सध्या म हाविकास आघाडीचे प्रमुख घटक आहेत. त्यांच्यासोबत जाणं, त्याचे नेतृत्व स्वीकारणे म्हणजे सत्तेतून बाजूला जावं लागेल. त्यामुळे राष्ट्रवादीतील बडे नेते ही भूमिका स्वीकारतील का हे पाहावं लागेल.

दोन्ही राष्ट्रवादींचे एकीकरण झाले आणि शरद पवारांनी एनडीएसोबत जाण्याची भूमिका घेतली तर त्याला या नेत्यांचा विरोध नसेल. मात्र पवारांनी जर महाविकास आघाडीसोबत कायम राहायचं ठरवलं तर मात्र छगन भुजबळ, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे यांच्यासह अनेक नेत्यांची पंचायतही होण्याची शक्यता आहे. यातील काही नेत्यांना त्यांच्यावरील कारवाया थांबवण्यासाठी भाजपमध्ये जाण्याशिवाय पर्याय नसेल असंही बोललं जातंय.

अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांशी चर्चा करून पुढची भूमिका, पुढचं पाऊल टाकलं जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या आधीच स्पष्ट केलं आहे. केंद्रात आणि राज्यात बळकट सत्ता असल्यामुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची सूत्रं कुणाकडे जावीत हे ठरवण्यामध्ये भाजप निर्णायक भूमिका घेऊ शकते. भाजपच्या चाणाक्यांकडूनही तशा हालच-ालीही केल्या जाण्याची शक्यता आहे. आपल्याला सोईचं होईल, पुढील राजकारण सोपस्कर होईल, तशी भूमिका घेणाऱ्याच्या हाती राष्ट्रवादी पक्षाची सूत्रं रा-हतील यासाठी भाजपकडूनही प्रयत्न केला जाण्याची शक्यता आहे. पक्ष संघटनेवर एकहाती वर्चस्व असलेल्या अजित पवारांच्या निधनानंतर त्यांचा राजकीय वारसदार कोण अस-ावा यासाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू असल्याचं चित्र आहे. त्याचं उत्तरही आपल्याला लवकरच मिळेल.

# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी ५ ऐवजी ७ फेब्रुवारी रोजी मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.

**९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी**

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जा-नेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांच्यी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६ च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जा-नेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जा-नेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फ ेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फ ेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

## पंढरीत माघी एकादशी सोहळ्यासाठी

# दोन लाख भाविक दाखल

पंढरपूर/प्रतिनिधी

माघी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपुरामध्ये दोन लाख भाविक दाखल झाले आहेत. त्यामुळे हरिनामाच्या गजराने पंढरी दमदम गेले आहे. माघी



एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे व प्रभारी व्यवस्थापक संदेश भोसले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. माघी यात्रेच्या गेल्या चार दिवसांपासून पंढरपुरात भाविक येण्यास सुरुवात झाली आहे. आज गुरुवार एकादशी सोहळ्यानिमित्त महिलांनी चंद्रभागेमध्ये पवित्र स्थान केले आहे. भाविकांनी दिंडी काढून हरिनामाचा गजर करत दिंडी सोहळा प्रदक्षणा मार्गे काढण्यात आला आहे. भाविकांना दर्शन करण्यासाठी दर्शनमंडपाची सोयरी सिद्धी मंदिरापर्यंत मोठे शेड उभा करून भाविकांना दर्शन करण्यासाठी सोय करण्यात आलेली आहे. भाविकांना पिण्याची पाणी ची सोय करण्यात आले आहे. तसेच ६५ , एकर मध्ये मध्ये सुद्धा वारकऱ्यांना सुखसुविधा देऊन पाण्याचे हे सोय करण्यात आ-लेले आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी त्यांना सुख सुविधा पुरविण्याचे काम करण्यात आलेले आहे.



## संपादकीय....

## तारीख बदलली

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखेमध्ये राज्य निवडणूक आयोगाने बदल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ५ फेब्रुवार रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारी रोजी होणार असून आहे. तर मतमोजणीची तारीखही बदलून ९ फेब्रुवारी करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी सविस्तर निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्या कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, निवडणूक चिन्ह वाटप तसेच अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे अद्याप शिल्लक होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्यानंतर राज्य शासनाने २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला. या कालावधीत कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम न घेण्याचे निर्देश असल्याने निवडणूक प्रक्रियेतील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली. या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ नंतर फक्त दोन आठवड्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने मतदान आणि मतमोजणीच्या तारखा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संबंधित जिल्हाधिकारी ३१ जानेवारी रोजी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची अधिकृत सूचना प्रसिद्ध करणार आहेत. त्यानुसार आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. नवीन कार्यक्रमानुसार जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजता होईल. तर ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू करण्यात येणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता तात्काळ संपुष्टात येईल.

# दादा, तुम्ही वेळ चुकवली!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवारी (दि. २७ जानेवारी) अजितदादा आणि मी असे आम्ही दोघे मंत्रिमंडळ बैठकीत एकत्र होतो. पाठोपाठ मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीची बैठक माझ्या कक्षात झाली; तेथेही दादा माझ्यासोबत होते. महाराष्ट्रात पायाभूत सुविधांवर अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक खर्च होतो, यावर दादांनी प्रश्न उपस्थित केला. प्रकल्प लांबू नयेत, यासाठी आम्ही दोघांनीही आसूड उठविले. सार्वजनिक बांधकाम खात्याने सरकारचे ७६४ कोटी कसे वाचविले, याची माहितीही देण्यात आली. दादांना आनंद झाला. सदोदित तिजोरीची काळजी करणारा अर्थमंत्री म्हणून मी निश्चिंत असायचो. 'अशाच गोड बातम्या प्रत्येक बैठकीत देत जा,' अशी कोपरखळीही त्यांनी मारली. पण, अशा बातम्या ऐकण्यासाठी पुढच्याच दिवसापासून आपण नसू, हे मात्र त्यांनी सांगितले नाही. ही बैठक झाल्यानंतर पुन्हा पाऊण तास आम्ही माझ्या दालनात गप्पा मारत बसलो होतो. नियती निष्ठूर असते, आपले काही चालत नाही. दादा, तुम्ही आजवर कधीही वेळ चुकवली नव्हती, या वेळी मात्र चुकवलीत. दादा, ही खंत कायम राहील, तुम्ही अकाली 'एक्झिट' घेतली.

बुधवारी सकाळी बारामतीजवळ विमान अपघात झाल्याची बातमी कानावर आली, तेव्हाही इतके काही विपरीत घडेल, असे वाटले नव्हते. डॉक्टर जोवर काही सांगत नाहीत, तोवर कोणत्याही बातमीवर विश्वास ठेवायला मन धजावत नव्हते. सुप्रियाताईंशी बोलणे होत होते. पण अखेर ती वाईट बातमी आलीच. माझा जवळचा, दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला. ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. कधीच विस्मरणात जाणार नाही, असा धक्का देणारा हा प्रसंग आहे.

दादा हे कायम माझे मित्र होते. खूप जवळून असे काम आम्ही २०१९ पासून केले असले तरी त्याही पूर्वी विकासाच्या किंवा राज्यहिताच्या विषयांवर आम्ही एकमेकांसोबत होतो. दूरगामी व्हिजन असलेले नेते फार कमी असतात. दादा हे त्यापैकी एक. शब्दाला जागणारा नेता, मित्र कसा असतो, हे मी अत्यंत जवळून दादांबाबत अनुभवले. कितीही संकट आले तरी शब्दाला किंमत असते आणि प्रसंगी ती मोजायचीही असते, हे दादांकडून शिकण्यासारखे आहे. काही इनिंग आम्ही नव्याने सुरू केल्या होत्या. ही इनिंग प्रदीर्घ चालेल, असे वाटत असतानाच दादांनी अकाली एक्झिट घेतली. २०१४ नंतर त्यांच्या तोंडी कायम माझे नाव 'सीएम साहेब' असे असायचे. २०१९ मध्ये ते उपमुख्यमंत्री झाले आणि मी विरोधी पक्षनेता. पण, सभागृहात बोलताना ते हमखास मला 'सीएम साहेब' म्हणायचे. मग हळूच जीभ चावून 'देवेंद्रजी' म्हणायचे.

आमची मैत्री राजकारणापलीकडची होती. अवांतर विषयांवर बोलण्याची मैफल दादा सोबत असले की घडायची. आम्ही कितीदा रात्री उशिरापर्यंत गप्पा करीत बसायचो. पण, त्यातही कामाच्या विषयांची त्यांची यादी तयार असायची. कोणत्या विषयांवर बोलायचे आहे, याचा कागद हाती असायचा. धीरगंभीर विषयांवर बोलून झाले की दादांचे व्यक्तिमत्त्व खुलायचे. मग त्यांच्यातील कुणाची आणि कशाचीही पर्वा न करणारे उत्तुंग आणि दिलखुलास दादा व्यक्त व्हायचे. त्यांच्यातील भावनाप्रधान दादा फार कमी लोकांनी पाहिले. पण, मला तेही दादा अनुभवता आले. कारण, आम्ही फार छोट्या कालखंडात पराक्रमच तेवढे केले.

राजकारणात अनेकदा माणसे वरकरणी पाहिली जातात; त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहिले जात नाही. पण, कामाचा प्रचंड आवाका आणि ठायी असलेला अनुभव या अर्थाने दादा एक अतिशय मोठे नेतृत्व. सकाळी सात वाजता दिवस सुरू करणारे दादा थांबत नसत. सरकारमध्ये असताना अनेकदा कठोर निर्णय घ्यावे लागतात. ते क्षणिक अप्रिय वाटत असले तरी दीर्घकालीन जनहिताचे असतात. अशा वेळी राजकीय कौशल्य पणाला लागत असते. व्यवस्थापन कौशल्यात जोखीम आणि हिम्मत दोन्ही ठेवावी लागते. असे निर्णय घेण्यातही दादा अग्रेसर असत. त्यामुळे त्यांच्यापुढे एखादी फाईल गेली किंवा विषय गेला तर दोनच उत्तरे ऐकू यायची. एकतर होकार किंवा नकार. 'पाहतो... करतो' ही शैली दादांना मान्यच नव्हती. या शैलीने लोक त्या क्षणी दुखावतातही. पण, ती दीर्घकाळासाठी जोडली जातात. सभागृहात उत्तरे देतानासुद्धा गुळगुळीत नाहीत, तर ठामपणे उत्तरे देताना ते दिसायचे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सभागृह सुरू होण्यापूर्वी दादा सभागृहात यायचे; मग ते मुंबई असो की नागपूर. सभागृहातील नवीन सदस्यांना शिस्त आणि नियम शिकवण्यातही त्यांचा नेहमी पुढाकार असायचा. मंत्रिमंडळ बैठकीत येण्यापूर्वी प्रत्येक प्रस्तावाचा अभ्यास करून ते आलेले असत. १८-२० विषय असले तरी नेमक्या कोणत्या विषयात कोणता मुद्दा उपस्थित करायचा, हे त्यांना ठाऊक असे.

आमच्यात काही समान गोष्टी होत्या. काम घेऊन येणारा आपल्या पक्षाचा की दुसऱ्याचा, याचा विचार दादांनी कधीच केला नाही. नेत्याने सतत जनतेत राहायचे असते, हेही पथ्य दादांनी आयुष्यभर पाळले. २४ बाय सात कामात व्यग्रता हेच सूत्र दादांनी कायम पाळले. आजही (२८ जानेवारी) ते आपल्या सभांसाठी भल्या पहाटे निघाले होते. दादा आणि मला दोघांनाही क्रिकेट सामना बघण्याची आवड. कोणताही सामना असला की मधूनच आम्ही दोघेही 'स्कोर' काय झाला, याची माहिती घेत असायचो. गाणी हादेखील आमचा समान आवडता छंद. त्यातच दादांचा 'सेन्स ऑफ ह्यूमर' अफलातून. कितीही गंभीर विषय असू द्या, ते थेट गमतीत बोलून समोरच्याची विकेट बेमालूमपणे घ्यायचे.

बांधकामाची गुणवत्ता या विषयात दादांना फार रस. प्रत्येक सरकारी बांधकामावर त्यांची कडक नजर असायची. अनेकदा सकाळी सहा वाजता त्यांनी बांधकामाची पाहणी केली आहे. जराही चूक सापडली, तर समोरच्याची ऐंशीतैशी करण्यास ते मागेपुढे पाहत नसत. त्यामुळेच त्यांच्या देखरेखीत झालेल्या सरकारी इमारती खाजगीलाही लाजवतील, अशा झालेल्या आहेत. बारामती मेडिकल कॉलेजची वीट न् वीट त्यांनी स्वतःच्या देखरेखीत ठेवली. नियतीने त्याच मेडिकल कॉलेजमध्ये त्यांचे पार्थिव आणले, ही पण एक विटंबनाच. मनात आज अनेक वेदना आहेत.

दादांना दूध प्यायला खूप आवडायचे. आमच्या हेलिकॉप्टरमध्ये सुगंधी दूध, ताक, कोल्ड्रिंक असायचे. पण, दादा नेहमी दुधाला पसंती देत. 'मी रोज हळद टाकून दूध घेतो,' असे ते आवर्जून सांगायचे सुद्धा. एकदा आम्ही विमानप्रवासात होतो. विषय रंगत गेले. मग विषय माझ्या आजवर झालेल्या विमान, हेलिकॉप्टर अपघातांपर्यंत येऊन पोहोचला. मी एकेक प्रसंग रंगवून सांगू लागलो. दादा गमतीने पायलटला म्हणाले, 'अरे बाबा, जवळ कुठली धावपट्टी दिसते का पाहा, मला खाली उतरव आणि मग पुन्हा उड्डाण करा.' मी दादांना सांगितले की, 'माझा ट्रॅक रेकॉर्ड आहे, माझे अपघात खूप झाले. पण, काळजी करू नका, मी विमानात असतो, की काही इजा होत नाही.' त्याच दादांना विमान अपघाताने आपल्यातून हिरावून न्यावे, ही शोकांतिकाच. जमिनीशी घट्ट नाळ जुळलेला माझा अत्यंत जवळचा सहकारी मी गमावला. हे माझे वैयक्तिक नुकसान तर आहेच; पण महाराष्ट्राचेही मोठे नुकसान आहे. दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला आहे.

'दादा, आजवर तुम्ही कधीही वेळ चुकवली नव्हती... यावेळी मात्र चुकवलीत.'

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# कळंब शहर डॉल्बीमुक्त करण्याची ज्येष्ठ नागरिकाची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब शहर व तालुक्यामध्ये दरवर्षी अनेकविध सार्वजनिक व वैयक्तिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात घेतले जातात. यात सर्व महापुरूषांच्या जयंती, पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. या प्रसंगी मोठ्या प्रमाणावर डॉल्बी वाजविल्या जातात याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर होतात.असे कार्यक्रम टाळण्यासाठी कळंब मधील सार्वजनिक असो कि वैयक्तिक कार्यक्रम डॉल्बीमुक्त व्हावा अशी मागणी जेष्ठ नागरिक यांनी पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात डॉल्बीमुळे डोळ्यांना अंधत्व, कानाला बहिरेपणा, तसेच मोठ्या आवाजामुळे हृदयविकाराचा झटका येऊन जीव गमावला जात आहे. गर्भवती महिलांना देखील मोठ्या आवाजामुळे धोका निर्माण होतो आहे. डॉल्बी लेझर मशीनच्या घातक किरणांनी सर्वांच्याच डोळ्याला न भरून निघणारी हानी होत आहे. विशेषतः कमकुवत आजारी व्यक्ती, लहान बालके, ज्येष्ठ नागरिक, रूग्ण, गर्भवती महिला यांच्यासाठी या डॉल्बीने गंभीर व भयंकर परिणाम होत आहे. याकडे लक्ष वेधले आहे.

यासाठी आपणास पुन्हा विनंती करण्यात येते की, येथुन पुढे सार्वजनिक हितासाठी आपण डॉल्बी विरोधात कठोर निर्णय घेऊन प्रतिबंधक उपायायोजना करावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, ऍड, त्र्यंबकराव मनगिरे, प्रा डॉ. संजय कांबळे, प्रा. जालिंदर लोहकरे, मुसदेख काझी, भास्कर सोनवणे, मज्जिद कुरेशी, प्रकाश भडंगे, अर्जुन ताकपीरे, महंमद चाऊस, सुरेश टेकाळे, सी .आर. घाडगे, दत्ता गायकवाड, के.डी .खापे, माधवसिंग राजपूत, अच्युत पौळ, सतपाल बचुटे, राजाभाऊ गायकवाड, यांच्या सह शहरातील अनेक नागरीक या वेळी उपस्थित होते.

# भिवंडीतील अंजुरफाटा चिंचोटी महामार्गावरील खड्डे व धुळीने नागरिक हैराण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मानकोली अंजुर फाटा ते चिंचोटी या महामार्गाची सध्या प्रचंड दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून खड्ड्यातून उडणाऱ्या धुळीनेही आता प्रवासी हैराण झाले आहेत. रस्त्याच्या दुरावस्तेकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पुरता दुर्लक्ष झाले आहे.

मानकोली अंजुरफाटा चिंचोटी या रस्त्यावर नेहमी अवजड वाहनांची ये-जा असते त्यामुळे या अवजड वाहनांच्या मागे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून रस्त्यावर मोठमोठाले खड्डे व धुळीमुळे या रस्त्यावरून प्रवास करताना दुचाकीस्वारांना प्रचंड त्रास होत आहे.

या रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी शासनाकडून निधी देखील मंजूर करण्यात आली असून ठेकेदाराने काम संथ गतीने सुरु केले आहे. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी रस्ता चांगला होता त्याच ठिकाणी ठेकेदाराने काँक्रेट कामाची सुरुवात केली असल्याने चांगला रस्ता खोदून ठेवला आहे.त्यामुळे बाजूच्या खड्डेमय रस्त्यावर प्रवास करतांना नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या कामाकडे विशेष लक्ष द्यावे व ठेकेदाराने रस्ता कॉंक्रीट करतांना बाजूचा खड्डेमय रस्ता आधी दुरुस्त करावा त्यानंतरच दुसऱ्या बाजूने कॉंक्रेटीकरण सुरु करावे अशी मागणी ग्राम पंचायत वडघरचे माजी सदस्य ऍड.नितीन पंडित यांनी केली आहे.

# मोहा येथे केंद्रीय प्राथमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रविण म. कसबे : कळंब तालुक्यातील मोहा येथे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी केंद्रीय प्राथमिक शाळेत विविध सांस्कृतीक कार्यक्रम मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला.

२६ जाने.सकाळी कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेच्या प्रांगणात तिरंगा ध्वज फडकवण्यात आला.

तसेच भारत माता की जय, वंदे मातरम् या जय घोष करीत गावातील प्रमुख रस्त्यांनी प्रभात फेरी काढण्यात आली.व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी इतिहासातील देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांची प्रतिकृती दर्शवनारे विविध अंगी सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार बक्षीस वितरण शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,पालक, विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे संचालक व ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विविध देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादरीकरण करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ, पालक,शिक्षक शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, गावातील शिक्षणप्रेमी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# श्रीराम क्लासेसच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : सातत्यपूर्ण प्रामाणिक परिश्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीच्या बळावर निफाड एज्युकेशन न्ड सोशल फाउंडेशन संचलित श्रीराम क्लासेस यांनी आपल्या यशस्वी वाटचालीची १७ वर्षे पूर्ण करून १८ व्या वर्षात पदार्पण केले असून. या निमित्ताने २५ जानेवारी २०२६ रोजी शिवनेरी लॉन्स, निफाड येथे सांस्कृतिक कार्यक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.. निफाड शहरात.... अवघ्या २ ते ५ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला हा ज्ञानवृक्ष आज शेकडो विद्यार्थ्यांना घडविणारा वटवृक्ष बनला आहे. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण देणारा निफाडमधील एकमेव क्लास म्हणून श्रीराम क्लासेसने ओळख निर्माण केली आहे....

केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे एवढ्यापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांना सुसंस्कृत, स्वयंप्रेरित, स्वयंशासित, स्वावलंबी व मूल्याधिष्ठित नागरिक घडविण्याचा संकल्प श्रीराम क्लासेसने यशस्वीरीत्या जपला आहे. विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे क्लासेसच्या गुणवत्तेचे द्योतक आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दीपज्योत प्रज्वलन करून , सरस्वती माता, श्रीराम व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणेश वंदना, उदे गं आंबे उदे, खंडोबाची हळद लागली, संत-विठ्ठल अभंग, शिवाजी महाराज, देशभक्तीपर गीत तसेच यावेळी सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून वारकरी संप्रदायाचे विचार, संतपरंपरा व भक्तीभाव लहान मुलांनी अत्यंत सुंदररीत्या सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. या सादरीकरणातून शिक्षणासोबत संस्कारांची जोपासना होत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

निफाड एज्युकेशन अँन्ड फाउंडेशनच्या वतीने गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मेघा जंगम मॅडम (संस्कारधन ग्रंथाच्या लेखिका), दिगंबर पाटील (अध्यक्ष - निफाड एज्युकेशन अँन्ड फाउंडेशन), ह.भ.प. राजेंद्रजी महाराज थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, व्याख्याते राहुल गिरी (बीड) यांनी पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर योग्य, अचूक आणि अभ्यासपूरक पद्धतीने करावा असे आवाहन केले.

श्रीराम क्लासेसच्या यशाबाबत बोलताना संचालक उल्हास पाटील व. सविता पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे यश हेच आमचे ध्येय आहे. पालक, विद्यार्थी व संपूर्ण शिक्षकवृंद यांच्या सहकार्यामुळेच गेल्या १७ वर्षांची ही यशस्वी वाटचाल शक्य झाली.

१४ एप्रिल २००८ पासून दरवर्षी सातत्याने बक्षीस वितरण व सत्कार सोहळा आयोजित करण्याची परंपरा श्रीराम क्लासेसने जपली असून, भविष्यातही शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचा निर्धार प्रा.उल्हास पाटील यांनी नी व्यक्त केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करत राहिले पाहिजे

## संतोष पाटील महाविद्यालय येथे सचिन वायकुळे यांचे प्रतिपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर प्रतिनिधी




शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करत राहिले पाहिजे स्पर्धेत शेवटच्या क्षणी सुद्धा संधी मिळू शकते, त्यामुळे नाव उमेद न होता प्रत्येकाने सतत प्रयत्नशील राहिली पाहिजे, असे प्रतिपादन प्रेरणादायी वक्ते सचिन वायकुळे यांनी केली. ते मुद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालय स्पर्धा परीक्षा विभागाच्या वतीने आई थोडे थांबा यश विभागाच्या वतीने आयोजित थोडे थांबा यश तुमची वाट पाह- ते या विषयावरील व्याख्यान प्रसंगी बोलत होते अध्यक्षस्थानी सोला- पूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे सचिव एमडी कांबळे होते. अध्यय स्थानी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे सचिव एमडी कांबळे व होते. यावेळी प्राचार्य डॉक्टर एमएन जगताप उपस्थित होते यावेळी सचिन वायकुळे मना लेगी स्पर्धा परीक्षेमध्ये अनेकदा पैशांचा सामना करावा लागतो. मात्र शेवटच्या टमट सुद्धा आपल्याला क्लास वन अधिकारी बनवू शकतो जिद्दी, चिकाटी ,मेहनत, व आत्मविश्वासाच्या बळावर सहज यश मिळवू शकते. यावेळी त्यांनी चंद्रावर उतरणारा पहिला माणूस नीला अर्मोस्ट्राँग यांच्या यशाची कहाणी सांगितली त्याचबरोबर दोन्ही पाय नसलेला ऑस्कर यांनी ऑलिंपिक मध्ये धावण्याच्या शर्यतीत मिळवलेल्या जागतिक यशाचा दाखलाही दिला अध्यक्ष स्थानावरून बोलताना संस्थेची सचिव एनडी कमळे म्हणाले की विद्यार्थी जशी पासून आपल्याला स्पर्धा परी- क्षेचे ज्ञान होणे आवश्यक आहे सातत्याने अभ्यास मेहनत करून एक मोठा अधिकारी होण्याची स्वप्न प्रत्येक विद्यार्थ्यांनी पाहिले पाहिजे. पाहिलेली स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे तेव्हा कठीण वाटणारी गोष्ट ही सहज साध्य होते प्राचार्य डॉक्टर एम एन जगताप यांनी स्वागत पर मनोगत व्यक्त केले स्पर्धा परीक्षेची विभाग समन्वयक प्राध्यापक बीपी कांबळे यांनी प्रास्ताविक केले व डॉक्टर एससी हजारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला सूत्रसंचालन पल्लवी माने यांनी केले तर प्राध्यापक डॉक्टर व्ही एन गायकवाड यांनी आभार मानले यावेळी प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# कळंब शहर बंद ठेवून अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
कळंब (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस नेते अजित (दादा ) पवार यांचे दिं.२८ जानेवारी २०२५ रोजी विमान अपघातात निधन झाले ही दुःखद वार्ता येतातच कळंब शहरात सर्वत्र शोक, दुःख व हळहळ व्यक्त करण्यात आली. कळंब शहरातील व्यापारी यांनी सर्व व्यवहार बंद ठेवून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्यासम ोर श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री अजित ( दादा )पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अजित दादा पवार अमर रहे ! अशा घोषणा देण्यात आल्या. अजित ( दादा ) पवार यांचा महाराष्ट्राच्या विकासात सिंहाचा वाटा आहे , स्पष्टवक्तेपणा , कणखर नेतृत्व, सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांशी बांधीलकी समजून त्यांनी कार्य केले.




त्यांच्या निधनाने महाराष्ट्र राज्याची न भरून येणारी हानी झाली आहे. अशा शब्दात आपल्या भावना नागरीकांनी व्यक्त करीत श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा- चे शहराध्यक्ष दत्ता तनपुरे, पंचायत समिती माजी सभापती भास्कर दादा खोसे, उपनगराध्यक्ष लखन गायकवाड , नगरसेवक हर्षद अंबुरे, माजी नगराध्यक्ष बबनराव वाघमारे,भाजपा चे शिवाजी गीड्डे, पत्रकार माधवसिंग राजपूत, राहुल हौसलमल, महेश फाटक, गजेंद्र तोडकर,राजाभाऊ बारगुले, शंकर गिलबिले, बालाजी माळी, उत्तरेश्वर चोंदे, श्याम नरवडे, युवराज नखाते, रमाकांत बारटक्के, अभिजीत हौसलमल, विक्रम चोंदे, शकील काझी, रेवण करंजकर , असिफ काझी, यांच्या सह कळंब शहरातील नागरिक, व्यापारी, यांनी श्रद्धांजली अर्पण केली. कळंब शहर कडकडीत बंद होते , तसेच शासनाने तीन दिवसाचा दुःखवटा जाहीर केला असून शासकीय कार्यालय, शाळा महाविद्यालय बंद ठेवण्यात आली.

# माघी एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीमातेची नित्यपूजा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर /प्रतिनिधी : माघी शुध्द जया एकादशी निमित्त मंदिर समितीच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणीमातेची नित्यपूजा संपन्न झाली. श्री विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजीराव मोरे तर रुक्मिणी मातेची नित्यपूजा मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली.

यावेळी सदस्या शकुंतलाताई नडगिरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, लेखाधिकारी मुकेश अनेचा व विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

# अमर मराठी विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/प्रतिनिधी : न्यु महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलीत अमर म राठी विद्यालय, सोलापूर येथे २६ जा- नेवारी २०२६ रोजी ७७ वा प्रवासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन श्री.धोत्रे सुनिल अंबादास हे होते. कार्यक्रमास संस्थेचे संचालक श्री एस.एस. धोत्रे,श्री ए.ए.धोत्रे,सौ.ए.एस. धोत्रे,सौ. एस.ए.धोत्रे हे उपस्थित होते.

प्रांरभी संस्थेचे चेअरमन श्री.धोत्रे सुनिल अंबादास यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतीमेचे पुजन करण्यात आले व प्रजासत्ताक दिनानिमि त्त त्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

ध्वजारोहणानंतर सर्वांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी कवायत संचलन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनीनी देशभक्तीपर गीत व नृत्ये सादर केली.

मयुरी राकेले,इशिता पेददी,मालनबी बागवान, शिवण्या चौगुले, अंबिका घोडके, श्रध्दा कटारे या विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्कृष्ठ भाषणे झाली. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना खाऊ वाटपानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रम ाचे सुत्रसंचालन श्रीमती अश्विनी म्हम ाणे यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. हंचाटे आर.आर.मॅडम केले.

# जि.प. तांदुळवाडी शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे
ता. २६ कळंब तालुक्यातील तांदुळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन अतिशय उत्साहात पार पडला. शाळेतील विद्यार्थ्यांनी गाव, परिसरात देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणाणून सोडला तसेच




यावेळी देशभक्तीपर गीतांचेही गायन करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयात माजी सैनिक श्री उद्धवराव काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी ध्वजारोहण केले. उपस्थितांना संबोधित करताना पुढील आठवड्यात होत असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या मतदान प्रक्रियेत गावातील शंभर टक्के लोकांनी सहभाग घ्यावा अशी शपथ यावेळी उपस्थितांना देऊन लोकशाहीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर संगीतावर कवायत ग्रामस्थांसम ोर सादर केली. तसेच देशभक्तीपर गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रमही यावेळी शाळेच्या वतीने सादर करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या भाषणाने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करण्यात आले.यावेळी उपस्थित गावकरी मंडळींनी मुलांना रोख बक्षिसे दिली.शाळेने मागील दोन दिवसात घेतलेल्या विविध शालेय क्रीडा स्पर्धा तसेच सावित्री जिजाऊ महोत्सवातील स्पर्धा आणि म हिलांसाठी आयोजित केलेल्या हळदीकुंकू स्पर्धेच्या विजेत्यांना यावेळी शालेय व्यवस्थापन समि ती अध्यक्ष, उपाध्यक्ष , सरपंच, मुख्याध्यापक, माजी शिक्षकांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात आली. शाळेच्या भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी शाळेला कमान, शाळेतील रंगरंगोटी,क्रीडा मैदान व क्रीडा साहित्य, वाचनालयासाठी पुस्तके, विज्ञान प्रयोगशाळा, ई लर्निंग सुविधा, संगणक कक्ष इत्यादीसाठी लोकसहभाग देण्याचे आव्हान मुख्याध्यापकांनी केले असता गावातील धर्मवीर संभाजी राजे युवा प्रतिष्ठानच्या वतीने तत्काळ ११००० रुपये जमा करण्यात आले.तसेच यापुढे शाळेसाठी ज्या काही गोष्टींची उणीव भासेल त्या आम्ही सर्व गावकरी मिळून पूर्ण करू असे आश्वासन उपस्थितांनी दिले. कार्यक्रमास गावातील बहुतांश माता-भगिनी, पालक, ग्रामस्थ, तरुण मंडळी, ग्रामपंचायतचे सर्व पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संतोष मोहिते व श्रीमती आशा पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती रसिका आगरकर यांनी केले.

# उगाव विद्यालयात माता पालक मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी
महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय उगाव येथे माता पालक मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिता पानगव्हाणे, उगाव ग्राम पालिका सरपंच, विद्याताई त्र्यंबके पोलीस पाटील उगाव, ग्रामपालिका सदस्या जयश्री पानगव्हाणे व डॉक्टर प्रतिभा जाधव व लताताई ढोमसे तसेच प्राचार्य कैलास गवळी व पर्यवेक्षक ढिकले यांचे उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली श्रीमती वाबळे यांनी विशाखा समिती, सखी सावित्री समिती, महिला संरक्षण समिती यांची कार्य व उद्दिष्टे सांगितली असून, विद्यार्थी समस्या शालेय भेट व मुलांना वेळ देणे याबाबत पालकांना माहिती दिली विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या समस्या आरोग्य मानसिकता, अती मोबाईल वापर टाळणे याबाबत पालकांना सजग केले , डॉक्टर जाधव यांनी मुलींच्या आरोग्य व आहार याबाबत विशेष माहिती दिली, सरपंच पानगव्हाणे यांनी शाळेच्या प्रगतीबाबत सर्वांचे कौतुक केले तसेच माता पालकांनीही आपले काही सम स्या व प्रश्न सांगितले. शाळेची शिस्त व अभ्यास चांगला आहे असे माता पालकांच्या कौतुकातून दिसून आले कार्यक्रमाच्या शेवटी हळदीकुंकू, उखाणे, मनोरंजनात्मक संगीत खुर्ची खेळ, कार्यक्रम झाले अंगणवाडी सेविका, डॉक्टर , अशा संख्या माता पालक उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनिता भारमल तर आभार सुनीता वाबळे यांनी मानले तसेच कार्यक्रमा च्या यशस्वीतेसाठी सरला बजाज, सरला आहेर, रुकसाना पठाण शीतल ढोमसे , शीतल आहेर या सर्व महिला शिक्षकांनी सहकार्य केले.



## जिल्हा कला व क्रीडा अविष्कार संपन्न

### विद्यार्थी कला गुणांना मिळतो वाव

# नंगपुरामुर्री निवासी शाळा जिल्हास्तरीय लोकनृत्य व भूमिका अभिनयात द्वितीय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी /गोंदिया :
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गोंदिया द्वारे आयोजित अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निव- ासी शाळा सरांडी येथे जिल्हास्तरीय कला व क्रीडा अविष्कार संपन्न झाले, यामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शाळा नंगपुरामुर्री येथील विद्यार्थी यांनी लोकनृत्य व भूमिका अभिनयात द्वितीय क्रमांक प्राप्त केला.




यावेळी बक्षीस वितरण करतांना मुख्याध्यापक रविशंकर ईठूले यांच्या अध्यक्षतेखाली नरेंद्र मेंढे, अस्मिता तेलंग आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकनृत्य सादरीकरण करण्यासाठी शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या म ार्गदर्शनाखाली नैतिक कुडवे, लोकेश मेश्राम, कुणाल बडोले, क्रिश जनबंधू, तन्मय वासनिक व

यथार्थ मेश्राम यांचा सहभाग होता. तर भूमिका अभिनयात सौरभ साऊस्कार, समंथ भोवते, युकांत शेंडे, सुशांत वालदे, अंश राऊत, गौतम खांडेकर व शिक्षक आशिष शहारे आदी सहभागी झाले होते. पर्यावरण समृद्ध करणारे सामाजिक व नैसर्गिक संदेश देणारे हे लोकनृत्य होते. द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल शाळे- तील शिक्षक नीता भलमे, साधना पारधी, प्रदीप ढवळे, तसेच शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# मोहा येथे विविध ठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मोहा प्रतिनिधी/प्रविण म.कसबे : कळंब तालुक्यातील मोहा ग्रामपंचायत येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्स- ाहात साजरा करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान देत असलेल्या म ान्यवरांच्या प्रतिमेचे पूजन मोहा ग्रामपंचायतीच्या सरपंच सिमा संदीप मडके यांच्या हस्ते तर केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका भिंगारे मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच मोहा विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी येथे सोसायटी संचालक हनुमंत मडके यांच्या हस्ते ध्वज- ारोहण करण्यात आले.

यावेळी मा.जिल्हा परिषद सदस्य तथा कळंब कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक संदीप मडके, उपसरपंच बशारत म ोमिन, संजय मडके, सोमनाथ मडके,बाबा मडके,अमर मडके, ग्रामपंचायत सदस्या रुपाली कसबे, समाधान कसबे, बाल- ाजी मडके, बाबा कसबे, राहुल कसबे, पांडुरंग मडके, पोलिस पाटील प्रकाश गोरे , तसेच म ोहा विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन श्री. गौतमराव मडके आदी मान्यवर शाळेचे विद्यार्थी, शिक्षकवृंद व गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते.

# परिवहन महामंडळाच्या अधिकृत धाब्यावर ग्राहकांची लूट

## प्रवाशांबरोबर मालक व कामगारांचे उद्धट वर्तन, प्रवासी दिना दिवशी प्रवाशांचा अनुभव व कारवाईची परिवहनमंत्र्याकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकृत बस धाब्यावरील हॉटेलमध्ये ग्राहकांची लूट होत असून सवलतीचे पदार्थ दर्जेदार व अधिकृत किमतीत मिळत नाहीत. त्यामुळे अशा हॉटेलवर तातडीने करावी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे परिवहन मंत्राकडे केली असली की माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.




राज्य परिवहन महामंडळाचे आपल्या प्रवाशांना प्रवासात योग्य किमतीतच नाष्टा मेळावा यासाठी मार्गावरील काही हॉटेलला अधिकृत दर्जा देऊन तिथे चहा पोहे उपीट इत्यादी पदार्थ सवलतीच्या दरात देण्याची योजना सुरू केली. त्याप्रमाणे पंढरपूर फलटण पुणे मार्ग वरील हॉटेल गारवाया ठिकाणी बसेस थांबतात मात्र तिथी सवलतीच्या दरातील पदार्थ मिळत नाहीत, शिवाय इतर पदार्थ अत्यंत निकृष्ट दर्जाचे मिळतात. राईस प्लेट रुपये १५०/ला ती ही अत्यंत निकृष्ट बेभाव अशी मिळते याबद्दल तक्रार केल्यास मालक व कामगाराकडून प्रवाशांना अतिशय उद्धटपणे उत्तरे मिळतात अपमानास्पद वागणूक दिली जाते.

हॉटेलमध्ये दर पत्रक नाही स्वच्छता नाही या हॉटेल बद्दल प्रवचनच्या वारंवार तक्रारी देत असूनही त्यावर कारवाई झाली नाही त्यामुळे अशा हॉटेलवर तातडीने कारवाई करून तेथील दहावी बंद करावी आपल्या बस स्थानकावर अधिकृत उपाहारगृहे चालू करावी ती यापूर्वी अनेक बस स्थानकावर उपाय चालू होते तिथे स्थानिक अधिकारी लक्ष ठेवत होते. त्यामुळे दर्जा आणि सेवा चांगली मिळत होती.

तरी याबाबत गांभीर्याने विचार करावा अशी विनंती प्रांत सहसचिव दीपक इरकल, सदस्य सुभाष सर देशमुख, विनोद भरते, जिल्हा सचिव सुहास निकते, उपाध्यक्ष निकम आराधी पंढरपूर तालुका अध्यक्ष नंदकुमार देशपांडे, उपाध्यक्ष प्रशांत मळवदे सचिव महेश भोसले सहसचिव आजाद अल्लापुरकर सागर शिंदे सतीश निपाणीकर यांनी केले आहे.

# कमलाकर सोनकांबळे पत्रकारिता कोर्समध्ये प्रथम क्रमांकाने उतीर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट,प्रतिनिधी

गौगांव (ता.अक्कलकोट) येथील दैनिक यश सिद्धी न्यूजचे संपादक कमलाकर सोनकांबळे यांनी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या पत्रकारिता कोर्समध्ये मध्ये ए ग्रेड पदवी घेऊन उतीर्ण झाले आहेत.त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



गोरगरीब व गरजू लोकांचे सेवा करताना कमलाकर सोनकांबळे यांना अनेक अडचणी आल्या पण खचून न जाता,समाजाचे काहीतरी देणे लागतो या उदांत हेतू बाळगून सामाजिक कार्य निरंतर ठेवले. सामाजिक बांधिलकी जपत सन २००० पासून वृत्तपत्रात काम सुरु केले.सुरुवातीच्या काळात दैनिक लोकमत युवामंच व दैनिक संचार मध्ये 'तरुणाई या सदरात कॉलेज जीवनात पत्रकारिता अनुभवले.

तसेच साप्ताहिक सत्यप्रिय या वृत्तपत्रात कार्यकारी संपादक व कालीगंगा या साप्ताहिक मध्ये क्राईम रिपोर्टर म्हणून काम पहिले.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई,अक्कलकोट शाखेचे अध्यक्षपदी निवड झाली.आणि ते मोठी जबाबदारी स्वीकारले अध्यक्ष म्हणून काम करताना सर्वांना विश्वासात घेऊन पारदर्शक काम केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातील सदस्य व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तीन वेळेस अध्यक्ष पदाची संधी मिळाली. सध्या ते दैनिक यश सिद्धी न्यूज संपादक म्हणून काम बघत आहे. त्यांनी पत्रकारिता कोर्स मध्ये ए ग्रेड घेऊन उत्तीर्ण झाले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, नवनाथ जाधव,. प्रा.डॉ.सूर्यकांत गायकवाड, सरपंच वनिता सुरवसे,प्रदीप जगताप,प्रा.सुनील गायकवाड,मधुकर सुरवसे आदी सह विविध क्षेत्रातून अभिनंदन केले व पुढील शुभेच्छा दिल्या.

# नळदुर्ग अक्कलकोट अर्धवट राष्ट्रीय महामार्गाने घेतला दुसरा बळी : संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांच्यावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्याची जनतेची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग ते अक्कलकोट राष्ट्रीय महामार्ग चे काम गेल्या अनेक वर्षापासून रखडले असून त्या अर्धवट राष्ट्रीय महामार्गाने नुकतच घेतला दुसरा बळी त्यामुळे नागरिकांतून संतापाची लाट उसळी असून संबंधित अधिकारी व गुतिदार यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे.



या बाबत सविस्तर वृत्त असे की नळदुर्ग ते अक्कलकोट राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या दहा वर्षांपासून शेतकऱ्यांनी आडवल्यामुळे जागोजागी रखडले आहे ज्या ठिकाणी काम अडवले त्या ठिकाणी रोडवर मोठे मोठे खड्डे पडून प्रवासी वाहनधारकांना दळणवळणासाठी मोठा अडथळा निर्माण झाला होता. त्यावर पर्याय म्हणून ज्या ठिकाणी काम रखडले आहे त्या ठिकाणी पूर्वीचा रस्ता जेवढा होता त्याचे तात्पुरते डांबरीकरण करून दळणवळणासाठी हा रस्ता सुरळीत करण्याचा प्रस्ताव मंजूर होऊन सहा ते सात महिन्यापूर्वीच त्या त्या ठिकाणी संबंधित अधिकारी यानी गुत्तेदार मार्फत रस्त्याचे डांबरीकरण केले खरे परंतु ते डांबरीकरणाचे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने सहा महिन्यातच जागोजागी उखडले पुन्हा दुरुस्त केले पुन्हा उखडले ते पुन्हा दुरुस्त केले असे सहा महिन्यात पूर्वी नव्याने झालेल्या डांबरीकरण कामाचे सहा वेळा दुरुस्ती करूनही ऊस वाहतूक ट्रॅक्टरने पुन्हा रस्ता जागोजागी उखडून खडी उघडी पडून मोठ मोठे खड्डे पडले. त्या रखडलेल्या आणि डाबरीकरण झालेल्या नळदुर्ग पासून काही अंतरावर गणेश मंदिराच्या जवळ या रोडवर मोठे मोठे खड्डे पडल्याने असून चार पाच दिवसापुर्वी चुंगी ता. अक्कलकोट येथील मोटार सायकल चालक सलीम फरीदा मुल्ला वय ६० वर्ष हे नळदुर्ग वरून चुंगीकडे जात असताना त्या रोडवर पडलेल्या खड्ड्यात गाडी स्लीप होऊन डोक्यावर पडल्याने दिनांक २८ जानेवारी २२६ रोजी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. यापूर्वीही त्याच ठिकाणी एक मोटर स्वार गाडी स्लीप होऊन पडल्याने त्याचा मृत्यू झाला होता.

एक वर्ष दीड वर्षाभरात राष्ट्रीय महामार्गाच्या अर्धवट कामाने आणि निकृष्ट दर्जाच्या केलेल्या डांबरीकरणमुळे या रस्त्यावर पडलेल्या खड्डयाने दोन मोटरसायकल स्वार प्रवाशांचा बळी घेतला.यामुळे या रस्त्यावरून ये जा करणाऱ्या प्रवाशी ग्रामस्था मध्ये संतापाची लाट उसळली असून संबधित मुख्यकार्यकारी अभियंता व गुत्तेदार यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा असी मागणी होत आहे.

# एलएलबी (लॉ) प्रवेशासाठीच्या 'सीईटी २०२६' या परीक्षेचे ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये एलएलबी (लॉ) ला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'सीईटी २०२६' या परीक्षेकरिता ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार तीन वर्ष कालावधी साठी शनिवार, दि.२४ जानेवारी २०२६ पासून ते शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत तर पाच वर्ष कालावधी साठी





रविवार, दि.२५ जानेवारी २०२६ पासून ते शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अशी मुदतवाढ देण्यात आली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

एलएलबी (लॉ) प्रवेशासाठी अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणार्या 'एमएएच-सीईटी २०२६' या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची मुदत तीन वर्ष कालावधीसाठी गुरुवार, दि.०८ जानेवारी २०२६ पासून ते शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ पर्यंत तर पाच वर्ष कालावधीसाठी शुक्रवार, दि.०९ जानेवारी २०२६ पासून ते शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ पर्यंत अशी मुदत दिली होती. परंतु या कालावधीत काही कारणाने विद्यार्थ्यांना प्रक्रिया पूर्ण करता आली नाही हे ओळखून या प्रक्रियेला मुदतवाढ दिली असून आता तीन वर्ष कालावधी साठी शनिवार, दि.२४ जानेवारी २०२६ पासून ते शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत तर पाच वर्ष कालावधी साठी रविवार, दि.२५ जानेवारी २०२६ पासून ते शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरु राहणार आहे. सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरी लॉ कॉलेजमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी सदर फॉर्म भरण्यासाठी येताना आपल्या प्रवर्गानुसार आवश्यक असणारी फॉर्म फी आणि आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावी. हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. सीईटी फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतःचा अपार आयडी तयार करून घ्यावा लागेल, तसेच आधार कार्ड, आयडेंटी आकाराचा रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड, ओटीपी करिता मोबाईल या महत्वाच्या बाबी आवश्यक असणार आहेत. याबाबत शासनाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी प्रा. उत्तम अनुसे (मोबा.-९१६८६५५३६५), तर एल.एल.बी. संदर्भात ॲड. विक्रम पाटील (मोबा.नंबर-९०९६०१६६२५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# जी. के. एस. महाविद्यालय खडवली तर्फे संशोधन पद्धती व वैज्ञानिक लेखनावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

कल्याण तालुक्यातील खडावली येथील जी. के. एस. कला,वाणिज्य व वाणिज्य महाविद्यालय खडवली तर्फे Research Methodology and Scientific Writing (संशोधन पद्धती व वैज्ञानिक लेखन) या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते . या कार्यशाळेचा उद्देश संशोधन क्षेत्रातील विद्यार्थी व प्राध्यापकांना संशोधन पद्धती, वैज्ञानिक लेखन तसेच संशोधन प्रकाशन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणे हा होता.

ही कार्यशाळा मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी मुंबई विद्यापीठाच्या विद्यापीठ संकुलातील राजीव गांधी सभागृह, कलिना, मुंबई येथे संपन्न झाली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एम. एच. फुलेकर (वरिष्ठ प्राध्यापक व संशोधन सल्लागार, पारुल विद्यापीठ, वडोदरा), मैत्रेय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा प्रा. कविता शिकतोडे तसेच शिक्षण संचालक डॉ. बी. एल. जाधव उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. सागर यांनी प्रास्ताविक भाषणात संशोधनाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर डॉ. एम. एच. फुलेकर यांनी विशेष मार्गदर्शनपर भाषण केले.

यानंतर तांत्रिक सत्रास प्रारंभ झाला. पहिल्या सत्रात डॉ. एम. एच. फुलेकर यांनी संशोधन प्रकल्प प्रस्ताव लेखन व निधी संस्थांकडे प्रस्ताव सादर करण्याच्या पद्धती यावर मार्गदर्शन केले.

डॉ. संगीता पवार (मुंबई विद्यापीठ) यांनी पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया, नोंदणी व संशोधन शिष्यवृत्ती याबाबत सविस्तर माहिती दिली.

डॉ. सत्यनारायण कोठे यांनी संशोधन समस्या निश्चित करणे व संशोधन प्रस्ताव तयार करणे यावर मार्गदर्शन केले, तर डॉ. संदीप वाघ यांनी संशोधन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध संशोधन पद्धती स्पष्ट केल्या. डॉ. संतोष गीते यांनी सांख्यिकीय पद्धती व डेटा विश्लेषणावर सखोल मार्गदर्शन केले.

तसेच डॉ. बी. एल. जाधव यांनी प्रबंध लेखनाबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली, तर डॉ. अहमद अली यांनी संशोधन प्रकाशने व पेटंट्स याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

ही कार्यशाळा संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली. सर्वांनी कार्यशाळेबाबत समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतीक्षा हिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सचिन जाधव यांनी केले. उपप्राचार्य प्रा. प्रशांत तांदळे यांच्यासह जी. के. एस. महाविद्यालयाच्या शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या गुणवत्ता पारितोषिक वितरण

# आदर्श पतसंस्था निर्माण करणे जिकरीचे कार्य : नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षक हे आधुनिकतेची कास धरून आदर्श विद्यार्थी घडवित असून ही अभिमानाची बाब आहे.तसेच आजच्या परिस्थितीत पतसंस्था काढणे सोपे असून ती व्यवस्थित चालवून आदर्श पतसंस्था निर्माण करणे जिकरीचे कार्य असल्याचे प्रतिपादन संगमनेरच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी केले.त्या निफाड तालुका माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे होते. पुढे बोलतांना डॉ.मैथिली तांबे यांनी आमचा संपूर्ण परिवार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सदैव पाठीशी असून त्यांचे प्रत्येक प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले.त्यानंतर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे यांनी शिक्षक पतसंस्थेच्या कामकाजाचा आलेख हा सदैव उंचावणारा असून आम्ही सोबत आहोत.तसेच तालुक्यातील प्रत्येक शाळेतील बोर्ड परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान देखील पतसंस्थेच्या वतीने करण्यात यावा अशी सूचना मांडली.

याप्रसंगी नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे,महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,पतसंस्थेचे संस्थापक शिक्षकनेते शिवाजीराव निरगुडे,संस्थापक अध्यक्ष कैलास भारती,विद्यमान अध्यक्ष खासदार भास्करराव भगरे,कार्यवाह राहुल दवते,उपाध्यक्ष बाळकृष्ण वाजे,संचालक रामराव बनकर,नगरसेवक साहेबराव बर्डे, बाळासाहेब गुंजाळ, गणेश महाले, किरण जाधव, भगीरथ सोनवणे, हेमलता जाधव, सोनाली होळकर, सुजाता तनपुरे, स्वि. संचालक महेंद्रसिंग राजपूत, बाळकृष्ण शिंदे यांसह एन डी एस टी चे संचालक समीर जाधव, ज्ञानेश्वर ठाकरे आदी व्यासपीठावर होते. त्यानंतर नगराध्यक्षा डॉ.मैथिली तांबे व कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे यांच्या हस्ते तालुक्यातील आदर्श शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना




तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना पतसंस्थेच्या वतीने सन्मान व पारितोषिक वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक खासदार भास्करराव भगरे सूत्रसंचालन संतोष बिऱ्हाडे,भालचंद्र सूर्यवंशी यांनी तर आभार राहुल दवते यांनी मानले.यावेळी व्यवस्थापक रतन दिवटे, ज्ञानेश्वर धाटबळे आदींसह तालुक्यातील शिक्षक परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### पुरस्कारार्थी मान्यवर

**आदर्श शिक्षक व कर्मचारी पुरस्कार सुनिता शिंदे, महेश अहिरे, संतोष बिऱ्हाडे, संदीप दाभाडे, सुभाष चौधरी, संगीता देशमाने, धर्मेंद्र निकम, योगिता पवार, कैलास पातळे, भारती लंबाते, किरण पाचपुते आदींना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.**

### अकरा हजार रुपयांची देणगी

**निफाडची वाचन संस्कृती जोपासणारे १०७ वर्ष पूर्ण असलेले श्री माणकेश्वर वाचनालय व न्या. रानडे यांच्या स्मरकास कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे यांनी भेट दिली.याप्रसंगी वाचनालयाच्या कामकाजाबाबत गौरोउद्गार काढून अकरा हजार रुपयांची देणगी दिली. असून वाचनालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला**